**महानगरपालिका सर्वसाधारण सभा**

**दिनांक २०/०१/२०२०**

# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर

(सचिवालय)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४४ अंतर्गत मा. सदस्यांनी प्रशासनाकडे विचारलेला प्रश्न खालील प्रमाणे नमूद असून त्याचा गोषवारा पुढील प्रमाणे.

| अ.क्र. | प्रश्न क्र. | मा. सदस्यांचे नाव | प्रश्नाचे उत्तर | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | अ. क्र | प्रश्न | उत्तर |
| १) | १७८ | श्री. रविंद्र (छोटु) प्रभाकर भोयर | १ | जुनी शुक्रवारी, शिवनगर, गणेशनगर, महावीर हनुमाननगर, चंदन नगर, सोमवारी क्वाटर आदिभागात 2017 ते 2018 पर्यंत किती वेळा पाणी येत होते. तसेच वंजारी नगर पाण्याच्या टाकीवरून किती एम.एल. डी. पाण्याचा पुरवठा या भागात होत असतो? | सन 2017 ते 2018 या कालवधीमध्ये जुनी शुक्रवारी, शिवनगर, गणेशनगर, महावीर नगर या भागात दोन वेळेस म्हणजे सकाळी 6 ते 7 आणि संध्याकाळी 5 ते 6 तसेच हनुमाननगर, चंदन नगर, सोमवारी क्वाटर या भागात सकाळी 6 ते 7 आणि संध्याकाळी सुद्धा 6 ते 7 या वेळेस पाणीपुरवठा होत होता. परंतु या सर्व भागात वंजारी नगर जलकुभावरून पाणीपुरवठा होत नाही |
| | | | २ | नवीन जलकुभ झाल्यानंतर म्हणजे रेशीमबाग बुधवारी बाजार व वंजारी नगर जलकुभ या वरून किती एम.एल. डी. पाण्याचा पुरवठा या भागात होत असतो? | नवीन जलकुभ झाल्यानंतर म्हणजे रेशीमबाग बुधवारी बाजार व वंजारी नगर या तिन्ही जलकुभावरून जवळपास 14.70 एम.एल.डी. एवढा पाणीपुरवठा होतो.<br>रेशीमबाग - 4.2 एम.एल. डी.<br>बुधवार बाजार - 7.5 एम.एल. डी.<br>वंजारीनगर नवीन - 3.00 एम.एल. डी. |
| | | | ३ | ओ.सी.डब्ल्यु क्पेक्सच्या माध्यमातून 12 ते 19 पर्यंत प्रभाग 31 मध्ये किती नवीन नळ कनेक्शन लक्ष्य होते व किती नळ कनेक्शन देण्यात आले व किती बाकी आहे? | कपेक्स च्या माध्यमातून प्र. क्र. 31 मध्ये जवळपास 11300 नवीन नळ कनेक्शन करावयाचे लक्ष्य होते. त्यापैकी एकून 7950 एवढे नळ कनेक्शन नवीन करण्यात आले. उर्वरित 3450 नवीन नळ कनेक्शन करण्याचे काम प्रगती पथावर आहे. (१७७९ Nos HSC are under refusal out of ३४५० Nos HSC) |

**हस्ता/- निगम आयुक्त**
**महानगरपालिका, नागपूर**

**महानगरपालिका सर्वसाधारण सभा**

**दिनांक २०/०१/२०२०**

# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर

(सचिवालय)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४४ अंतर्गत मा. सदस्यांनी प्रशासनाकडे विचारलेला प्रश्न खालील प्रमाणे नमूद असून त्याचा गोषवारा पुढील प्रमाणे.

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>प्रश्न क्र.</th><th>मा. सदस्यांचे नाव</th><th colspan="3">प्रश्नाचे उत्तर</th></tr>
<tr><td rowspan="4">३)</td><td rowspan="4">१८०</td><td rowspan="4">श्री. राजेंद्र विठ्ठलराव सोनकुसरे</td><td>अ. क्र</td><td>प्रश्न</td><td>उत्तर</td></tr>
<tr><td>१</td><td>प्रशासकीय सेवेत काम करणा-या १ ते १० झोन मध्ये वर्ग १,२ व ३ गटातील अधिकारी एकाच पदावर ५ वर्षाच्या वरील कार्य करीत असलेल्या कर्मचा-यांची संख्या किती ? याची माहिती देण्यात यावी.</td><td>एकाच विभागात ५ वर्षापेक्षा जास्त कालावधीपासून कार्यरत कर्मचा-यांची माहिती संकलीत स्वरूपात उपलब्ध नसल्यामुळे सर्व विभाग/झोन कडून माहिती मागविण्याकरीता पत्र देण्यात आले असून माहितीचे संकलन करणे सूरू आहे. सध्यपरिस्थीतीत १२ विभाग/झोन मधून माहिती प्राप्त असून त्यानुसार शासन धोरणानुसार १७९ कर्मचा-यांना एकाच विभागात / झोनमध्ये ५ वर्षाचे वर कालावधी झालेला आहे. उर्वरीत माहितीचे संकलन करून पूरविण्यात येईल.</td></tr>
<tr><td>२</td><td>५ वर्षावरील कर्मचा-याच्या अंतर्गत बदल्या किती करण्यात आल्या व किती राहल्यात व ते का करण्यात आल्या नाही तसेच एकाच पदावर व एकाच ठिकाणी किती वर्ष सर्विस करण्यात येते याबाबत प्रशासनाचे काही नियम व अटी लागु केल्या आहेत का ? याबाबत माहिती.</td><td>सन २०१८ व २०१९ मध्ये विविध संवर्गातील एकूण २६८ कर्मचारी अधिकारी यांची बदली करण्यात आलेली आहे. .<br>महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्रमांक एसआरव्ही-१०९७/प्र.क्र २७/९७/बारा दि. २७ नोव्हेंबर १९९७ नुसार नागपूर महानगरपालि केचे परिपत्रक क्रमांक ७०/आस्थापना दिनांक २२.०५.२०१८ परिपत्रक काढण्यात आले. या परिपत्रकामध्ये शासन धोरणानुसार खालीलप्रमाणे बदली धोरण आहे.(परिपत्रक प्रत संलग्न)<br>१) वरील १ व २ चे अधिका-याची बदली दर तीन वर्षानंतर करण्यात यावी.<br>२) वर्ग- ३ च्या कर्मचा-यांची बदली दर ५ वर्षानंतर करण्यात यावी.<br>३) वर्ग-४ च्या कर्मचा-यांची बदली ७ वर्षानंतर करण्यात यावी.<br>नागपूर महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचारी यांचे बदलीचे धोरण ठरविण्याकरीता नुकतेच मा आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आलेली आहे</td></tr>
<tr><td>३</td><td>१ ते १० झोन मध्ये किती कनिष्ठ अभियंता कार्यरत आहे</td><td>झोन १ ते १० मध्ये झोन निहाय एकूण ३८ कनिष्ठ अभियंता कार्यरत आहेत.</td></tr>
</table>

**हस्ता/- निगम आयुक्त**
**महानगरपालिका, नागपूर**

**महानगरपालिका सर्वसाधारण सभा**

**दिनांक २०/०१/२०२०**

# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर

(सचिवालय)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४४ अंतर्गत मा. सदस्यांनी प्रशासनाकडे विचारलेला प्रश्न खालील प्रमाणे नमूद असून त्याचा गोषवारा पुढील प्रमाणे.

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>प्रश्न क्र.</th><th>मा. सदस्यांचे नाव</th><th>प्रश्नाचे उत्तर</th></tr>
<tr><td>४)</td><td>१८१</td><td>श्री .प्रवीण प्रभाकर दटके</td><td>
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>प्रश्नाचे विवरण</th><th>उ-तर</th></tr>
<tr><td>१</td><td>नागपूर सुधार प्रन्यासकडून नागपूर महानगरपालिकेला कोणकोणते कार्य/ योजना हस्तांतरीत करण्यात आल्या आहे. सध्या स्थितीत त्या योजनेचे परिस्थीत काय आहे. कोणत्या कार्याची जवाबदारी नागपूर सुधार प्रन्यासकडून नागपूर मनपाकडे आली आहे ?</td><td>शासन निर्णय क्र. टिपीएस-२४१९/१४१९/ प्र.क्र. १५४/२०१९/नवी -९, दि. २७ ऑगस्ट २०१९ चे शासन निर्णयानूसार खालील तक्त्यात नमुदनूसार नियोजन प्राधिकरण म्हणून महानगरपालिकेस स्किम हस्तांतरीत झालेल्या आहेत.
<table>
<tr><th>Sr. No.</th><th>Name of the Scheme</th><th>Total Area notifed under the scheme (Approx) in Hectares</th></tr>
<tr><td>1</td><td>Eastern Industrial Area street Scheme</td><td>320.60</td></tr>
<tr><td>2</td><td>Itwara Station Road street Scheme</td><td>4.77</td></tr>
<tr><td>3</td><td>Sitabuldi (West) Improvement scheme</td><td>6.15</td></tr>
<tr><td>4</td><td>Abhyakar Road and Buti Mahal street Scheme</td><td>3.24</td></tr>
<tr><td>5</td><td>Wathoda Extenstion Housing Accomodation Scheme (New Scheme)</td><td>170.00</td></tr>
<tr><td>6</td><td>Shivangan Jaitala Township (New Scheme)</td><td>257.00</td></tr>
<tr><td>7</td><td>Green Belt Control Scheme</td><td>6447.00</td></tr>
<tr><td colspan="2">Total</td><td>7208.76</td></tr>
</table>
</td></tr>
<tr><td>२</td><td>नागपूर सुधार प्रन्यासचे कोणकोणते विभागाचे कार्याची जवाबदारी नागपूर महानगरपालिकेकडे आली आहे ?</td><td>शासन निर्णय क्र. टिपीएस-२४१९/१४१९/ प्र.क्र. १५४/२०१९/नवी -९, दि. २७ ऑगस्ट २०१९ चे शासन निर्णयानूसार नियोजन प्राधिकरण म्हणून महानगरपालिकेस ७ स्किम व गुंठेवारी अंतर्गतचे क्षेत्र हस्तांतरीत झालेल्या आहेत.</td></tr>
<tr><td>३</td><td>नागपूर सुधार प्रन्यासचे कोणकोणत्या विभागाचे किती कर्मचारी नागपूर महानगरपालिकेत नियुक्त करण्यात आले आहे ?</td><td>सध्यास्थितित नागपूर सुधार प्रन्यासचे कोणत्याही विभागाचे कर्मचारी नागपूर महानगरपालिकेत नियुक्त करण्यात आलेले नाहीत.</td></tr>
</table>
</td></tr>
</table>

**हस्ता/- निगम आयुक्त**
**महानगरपालिका, नागपूर**

**महानगरपालिका सर्वसाधारण सभा**

**दिनांक २०/०१/२०२०**

# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर

(सचिवालय)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४४ अंतर्गत मा. सदस्यांनी प्रशासनाकडे विचारलेला प्रश्न खालील प्रमाणे नमूद असून त्याचा गोषवारा पुढील प्रमाणे.

| अ.क्र. | प्रश्न क्र. | मा. सदस्यांचे नाव | प्रश्नाचे उत्तर | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | अ. क्र. | प्रश्न | उत्तर |
| ५) | १८२ | श्री. संजय मधुकर महाकाळकर | १ | नागपूर महानगरपालिकेच्या नेहरुनगर झोन क्र. ५ अंतर्गत प्रभाग क्र. ३० (ड) मध्ये प्रमुख मार्गावर व फुटपाथवर कचरा साचून राहतो व साफसफाईचा अभाव दिसुन येतो. | नागपूर महानगरपालिकेच्या नेहरुनगर झोन क. ५ अंतर्गत प्रभाग क्र. ३० (ड) मधील प्रमुख मार्गाची व फुटपाथाची साफसफाई करण्यात आलेली आहे व नियमित रित्या साफसफाई राहिल याची दक्षता घेण्यात येत आहे. |
| | | | २ | प्रभागामध्ये कचरागाडी येत नसल्याबाबत नागरिकांच्या अनेक तक्रारी आहेत. मी, याबाबत वेळोवेळी झोन अधिकाऱ्यांना पत्राद्वारे कळविले असता याबाबत कुठल्याही प्रकारची कार्यवाही झालेली दिसुन येत नाही. | कचरा संकलनाबाबत नागरीकांकडुन झोन स्तरावर काही तक्रारी प्राप्त् झाल्या होत्या व सदर तक्रारीचे निवारण करण्याचे दुष्टिने अनुषंगीक कार्यवाही करण्यात आली आहे. |
| | | | ३ | नविन ऐजन्सीद्वारे कमी कचरा गाडया उपलब्ध केल्यामुळे कचरा उचलण्याच्या कामात सुध रणा झालेली दिसुन येत नाही, तरी कचऱ्याची उचल करण्याकरीता प्रभागात करारानुसार किती गाडयांची आवश्यकता आहे व किती गाडया सध्या उपलब्ध आहेत याबाबत सविस्तर माहिती उपलब्ध करुन दयावी. | मे. ए.जी. इनव्हायरो प्रा. लि. या ऐजन्सीला घराघरातुन १००% कचरा संकलन करुन वाहतुक करण्याचे कंत्राट देण्यात आलेले असल्यामुळे संबंधीत ऐजन्सीने घराघरातुन १००% कचरा संकलन करण्याकरीता गाडी उपलब्ध् करुन देणे आवश्यक् आहे. तथापी करारनामा अद्याप झालेला नाही सद्यास्थितीत प्रभाग क्र. ३० मध्ये कचरा संकलनाकरीता खालील प्रमाणे गाडया कार्यरत आहे.<br>१) टाटा एस – ०६ गाडया<br>२) टाटा झिप – ०१ गाडया<br>३) सायकल रिक्षा – ०५<br>४) चिकन मटन करीता – ०१ गाडया<br>५) इतर कचरा व ग्रीन वेस्ट् संकलनाकरीता – ०१ गाडया<br>६) व्यवसायीक क्षेत्राकरीता – ०१ गाडया<br>या व्यतीरीक्त् आवश्यकतेनुसार प्रभाग क्र. ३० मध्ये नविन ०१ टाटा झिप गाडी कचरा संकलनाकरीता वाढविण्यात आलेली आहे. |

**हस्ता/- निगम आयुक्त**
**महानगरपालिका, नागपूर**

**महानगरपालिका सर्वसाधारण सभा**

**दिनांक २०/०१/२०२०**

# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर

(सचिवालय)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४४ अंतर्गत मा. सदस्यांनी प्रशासनाकडे विचारलेला प्रश्न खालील प्रमाणे नमूद असून त्याचा गोषवारा पुढील प्रमाणे.

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>प्रश्न क्र.</th><th>मा. सदस्यांचे नाव</th><th>प्रश्नाचे उत्तर</th></tr>
<tr><td>६)</td><td>१८३</td><td>श्री. मनोज दशरथ सांगोळे</td><td>
<table>
<tr><th>lk'u</th><th>mRrj</th></tr>
<tr><td>मौजा सिताबर्डी कामठी रोड येथील गड्डीगोदाम चौक ते पाटणी ऑटोमोबाईल्स, एल.आय.सी. चौकापर्यंत वाहतूक अडथळे निर्माण करणा–या इमारतीचे अतिक्रमण आजपर्यंत का काढण्यात आले नाही? या रितरस माहिती सभागृहा समोर देण्यात यावे?</td><td>गड्डीगोदाम चौक ते पाटनी ऑटोमोबाईल्स, एल.आय.सी. चौक हा रस्ता विकास आराखडयामध्ये 24 मी. दर्षविलेला आहे. सद्यस्थितीत या रस्त्यावर महामेट्रोतर्फे ब्रिज व मेट्रोचे काम सुरू असल्यामुळे वाहतूकीस अडथळा निर्माण होतो. तसेच महामेट्रोतर्फे मेट्रो व ब्रिजचे बांधकाम बाधीत करण्या–या 13 इमारतींमध्ये मार्कींग केलेले आहे. तथापि गड्डीगोदाम चौक ते पाटनी ऑटोमोबाईल्स, एल.आय.सी. चौका पर्यंत एकूण 34 इमारती असुन प्रामुख्याने व्होरा कॉप्लेक्स या इमारतीमुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत असल्यामुळे सदर ईमारतीवर डण्त्ज्च्छ ।बजए कलम 53(1) अन्वये दि. 09/01/2020 रोजी नोटीस कारवाई करण्यात आली आहे.</td></tr>
</table>
</td></tr>
</table>

**हस्ता/- निगम आयुक्त**
**महानगरपालिका, नागपूर**

**महानगरपालिका सर्वसाधारण सभा**

**दिनांक २०/०१/२०२०**

# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर

(सचिवालय)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४४ अंतर्गत मा. सदस्यांनी प्रशासनाकडे विचारलेला प्रश्न खालील प्रमाणे नमूद असून त्याचा गोषवारा पुढील प्रमाणे.

| अ.क्र. | प्रश्न क्र. | मा. सदस्यांचे नाव | प्रश्नाचे उत्तर |
|---|---|---|---|
| ७) | १८४ | श्री. प्रवीण प्रभाकर दटके | |

| अ.क्र. | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| 1 | नागपूर महानगरपालिकेचे आस्थापनेवर किती कर्मचारी कार्यरत आहे व किती किती कर्मचाऱ्यांनी एम.एस.सी.आय.टी चे संगणक प्रमाणपत्र सादर करून वार्षिक वेतनवाढ घेतली आहे अशा कर्मचाऱ्यांची संख्या किती व त्यांच्या वार्षिक वेतनवाढीवर झालेला खर्च किती | नागपूर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर दिनांक ३१.१२.२०१९ ला वर्ग १ चे **१०३** वर्ग २ चे **२४** व वर्ग ३ चे **३०२५** इतके असे एकुण **३२५२** अधिकारी / कर्मचारी कार्यरत आहेत. एम. एस. सी. आय.टी केल्यामुळे अतिरीक्त वार्षिक वेतनवाढ देय नसून, जुलै महिण्याला वार्षिक वेतनवाढ देताना एम.एस.सी.आय.टी परिक्षा उत्तीर्ण केली नसल्यास संबधित आहरण व वितरण अधिकारी (डी.डी.ओ) यांच्यातर्फे वार्षिक वेतनवाढ रोखण्यात येते. विभागनिहाय सर्व विभागाचे आहरण व वितरण अधिकारी वेगवेगळे असून उक्त माहिती संकलित स्वरुपात उपलब्ध नसल्यामुळे आहरण व वितरण अधिकाऱ्यांना ही माहिती सादर करण्यास्तव पत्र क्र. साप्रवि/९६/ओ, दिनांक १०/०१/२०२० रोजी निर्गमीत करण्यात आले असून प्राप्त विभागाची माहिती परिश्ष्टि "अ" प्रमाणे सादर करण्यात आली आहे. उर्वरीत माहिती संकलित करुन सादर करण्यात येईल. |
| 2 | नागपूर महानगरपालिकेमध्ये कंत्राटी पध्दतीवर (सी.एफ.सी.) कार्यरत असलेली संगणक ऑपरेटरची संख्या किती व त्यांच्या वेतनावर दरमहा किती खर्च येतो. | नागपूर महानगरपालिके मध्ये (सी. एफ. सी.) कंत्राटदारामार्फत पुरविण्यात आलेले संगणक ऑपरेटर्सची संख्या १६३ इतकी आहे एका संगणक ऑपरेटरच्या वेतनावर महिण्याला खालीलप्रमाणे खर्च येतो. |

| Sr. No | Particular | Amount In Rs. |
|---|---|---|
| 1 | Basic Pay | 14000 |
| 2 | Special Pay | 4760 |
| 3 | Sub Total (1) | 18760 |
| 4 | EPF @ 12% (On Sub Total (1) | 2251 |
| 5 | Administrative Charges 1% on Sub Total (1) | 188 |

| | | |
|---|---|---|
| 6 | ESIC 3.25 % on Sub Total (1) | 610 |
| | 8.33 % Bonus | 1563 |
| 7 | Sub Total (II) | 23372 |
| 8 | Contractor Profit / Service Charges | 2814 |
| 9 | Grand Total | 26186 |

साधारणत: १६३ संगणक चालकांच्या वेतनावर दर महिण्याला रु. ४२.६८ लक्ष खर्च अपेक्षित आहे.

तथापि हजेरीपत्रकानुसार सप्टेंबर २०१९ या महिण्यात रु. ४०.८१ लक्ष ऑक्टोंबर २०१९ या महिण्यात ४१.२४ लक्ष, नोव्हेंबर २०१९ या महिण्यात ४०.९८ लक्ष व डिसेंबर २०१९ या महिण्यात ४१.२८ लक्ष इतका मासिक खर्च वेतनावर आला आहे.

**हस्ता/- निगम आयुक्त**
**महानगरपालिका, नागपूर**

**महानगरपालिका सर्वसाधारण सभा**

**दिनांक २०/०१/२०२०**

# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर

(सचिवालय)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४४ अंतर्गत मा. सदस्यांनी प्रशासनाकडे विचारलेला प्रश्न खालील प्रमाणे नमूद असून त्याचा गोषवारा पुढील प्रमाणे.

| अ.क्र. | प्रश्न क्र. | मा. सदस्यांचे नाव | प्रश्नाचे उत्तर |
|---|---|---|---|
| ८) | १८५ | श्री .विजय झलके (पिंटु) | |

| अ.क्र. | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १. | नागपूर शहरात आतापर्यंत एकुण किती एल. ई.डी. फिटिंग लावण्यात आल्या. | सद्य:स्थितीत नागपूर शहरात एकुण १,३९,०४३ एल.ई.डी. फिटिंग्ज लावण्यात आल्या आहेत. |
| २. | कोणत्या कंपनीच्या व किती वॅटेजच्या एल.ई. डी. फिटिंग लावण्यात आल्या (झोन निहाय) | सर्व फिटिंग्ज में. फिलिप्स या कंपनीच्या लावण्यात आल्या आहेत. वॅटेज अनुसार एल.ई.डी. फिटिंग्ज्चा झोन निहाय तक्ता सोबत जोडलेला आहे. |
| ३. | एल.ई.डी. फिटिंगचे दर कोणत्या आधारे निश्चित करण्यात आले तो दर किती. | एल.ई.डी. फिटिंग्ज् चे दर आवेदने बोलवून (प्राकलन तयार करण्याकरीता) निश्चित करण्यात आले आहेत. |
| ४. | एल.ई.डी. फिटिंग या निश्चीत दरापेक्षा कमी किंवा अधिक किमतीत घेण्यात आल्या. | एल.ई.डी. फिटिंग्जचे भूगतान ई.एम.आई. च्या स्वरुपात एकुण ८४ महिने करावयाचे असल्यामुळे निश्चित दरापेक्षा कमी किंवा जास्त घेण्यात आले असे म्हणता येत नाही. जसे नमूद केलेल्या दराच्या फिटिंग्ज् ८४ ई.एम.आय. मधे भुगतान करावयाचे असल्याने कंत्राटदारने दर म्हणजेच कमी किंवा अधिक टक्के देईल त्या दराने येणाऱ्या रकमेस ८४ ने भाग देऊन ई.एम.आय. निश्चित करण्यात येईल अशी तरतूद निविदेत होती. उदा. ३७ वॅट एल.ई.डी. फिटिंग्ज् चा दर रु. ९,९००/- होता या दरावर ७०% ने जास्त म्हणजेच रु. ६,९३०/- अधीक व रु. ९,९००/- + रु. ६,९३०/- = रु. १६,८३०/- भागीले ८४ म्हणजेच ई. एम.आय. (प्रती माह कंत्राटदारास दयावयाची रक्कम) ची राशी रु. २०० पैसे ३७ अशी होते. |
| ५. | एल.ई.डी. फिटिंगचे दर निश्चीत दरापेक्षा किती टक्के अधिकच्या दराने घेण्यात आली. | वर निविदेमधे अनु. क्र. ४ च्या उत्तराप्रमाणे |
| ६. | ज्या कंपनीच्या एल.ई.डी. फिटिंग लावण्यात आल्या त्याची विशेषतः काय या विशेषतेच्या अन्य कंपनीच्या दराबाबत सदर कंत्राट देत असतांना तपसणी केली किंवा कसे. | म.न.पा. ने फिटिंग्ज् चे स्पेसिफिकेशन्स मागीतले होते त्यांची मुख्य विशेषतः खालीलप्रमाणे. १. १२० व्होल्ट ते २७० व्होल्ट या रेंजमधे मात्र ऑपरेटींग व्होल्टेज २३० व्होल्ट (या नॉर्मल व्होल्टेज) ऐवजी १५० व्होल्ट जेणेकरुन या व्होल्टेजवर हूक (आकडे) टाकून विज चोरीस आळा बसेल. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | २. कोणत्याही कंट्रोलद्वारा ट्रिगरची आवश्यकता न भासता स्वतः (Stand alone) दोन वेळा डिम होऊन अधिकची विजेची बचत करण्याची क्षमता असलेले एल.ई.डी. पथदिवे उल्लेखनीय बाब अशी की वर नमूद विशेषता असण्याबाबतचे थर्ड पार्टी टेस्ट सर्टीफिकेटस निविदेसोबत टाकावयाच्या अटीच्या अनुषंगाने फक्त फिलिप्स कंपनीच्या फिटिंग्ज् करीताच असे सर्टीफिकेटस प्राप्त झाले त्यामुळे इतर कंपनीच्या फिटिंग्ज्ची विशेषताच्या बाबतीत तुलना करण्याचा प्रश्न उद्‌भवला नाही.<br>३. सात वर्षाची गॅरेंटी व उत्पादक कंपनीकडून ७% ची बॅक गॅरंटी |
| | | | ७. | आता शहरात नवीन खांबावरील एकुण किती फिटींग लावणे शिल्लक असून किती नवीन फिटींग कोणत्या दराने घेण्यात येणार आहे. | सध्यापर्यंत १९२०४ फिटिंग नविन खांबावर लावण्यात आली असून पुढे ७००० फिटिंग्ज् नविन खांबावर लावण्याचे अपेक्षित आहे. स्थायी समिती ठराव क्र. ५२६ दि. १२.०९.२०१६ मधे अनु. क्र. ६ वर सद्यःस्थितीत विविध मंजूर झालेल्या कामांमधे तसेच मंजूरीच्या प्रक्रियेमधे असलेल्या ज्या कामांमधे पथदिवे बसविणे अंतर्भुत आहे त्या कामातील पथदिव्यांचा सदर प्रस्तावातील कामाचा समावेश करावा व या प्रस्तावाच्या अनुषंगाने देण्यात येणाऱ्या कंत्राटामधे पथदिवे बसविण्याचा जो अवधी आहे त्यामधे जे नविन पथदिवे लावावयाचे काम राहील त्याचाही सदर प्रस्तावातील कामांमधे समावेश राहील या दृष्टिने कार्यवाही करावी जेणेकरुन या पथदिव्यांचे एक रकमी भुगतान करण्याचा प्रश्न उद्‌भवणार नाही असे करुन मंजूरी प्राप्त झाली असल्याचे अनुषंगाने निविदा प्रपत्रातही तशी तरतूद केलेली असल्याने व त्या अनुषंगाने ७००० अधिकचे एल.ई.डी. पथदिवे सदर कामाच्या निविदा प्रपत्रातील अटी शर्तीनूसार अनुज्ञेय असल्याने झोननिहाय मंजूर कंत्राटदारांकडून स्थायी समिती च्या मंजूरीनंतर बसविण्यात येईल. |

**हस्ता/- निगम आयुक्त**
**महानगरपालिका, नागपूर**

**महानगरपालिका सर्वसाधारण सभा**

**दिनांक २०/०१/२०२०**

# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर

(सचिवालय)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४४ अंतर्गत मा. सदस्यांनी प्रशासनाकडे विचारलेला प्रश्न खालील प्रमाणे नमूद असून त्याचा गोषवारा पुढील प्रमाणे.

| अ.क्र. | प्रश्न क्र. | मा. सदस्यांचे नाव | अ. क्र. | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|---|---|---|
| ९) | १८६ | श्री .प्रफुल्ल विनोदराव गुडधे | | | |
| | | | १ | नागपूर महानगरपालिके मार्फ़त शहरातील मालमत्ता सर्वेक्ष्णाकरीता किती कंपन्यांना नियुक्त करण्यात आले आहे. प्रत्येक कंपनीला कोणती जबाबदारी देण्यात आली आहे. | सर्व्हेक्ष्णाचे काम दोन एजन्सीला देण्यात आले<br>नागपूर महानगरपालिका सिमेतील मिळकती करीता गोळा करावयाच्या जी.आय.एस. डाटाच्या कामातील भाग "अ" अंतर्गत सॉफ्टवेअर तयार करणे व हार्ड़वेअरचा पूरवठा करणेची जबाबदारी व भाग "ब" अंतर्गत म.न.पा. सीमेतील सर्व मिळकती करीता घरोघरी जावून जी.आय.एस. डाटा गोळा करणेची जबाबदारी मे. सायबरटेक सिस्टीम्स़ ॲन्ड़ सॉफ्टवेअर लि. हया कंपनीला म.न.पा स्थायी समिती ठराव क्र. १६२ दिनांक १०/०९/२०१५ अन्वये देण्यात आली तदनंतर म.न.पा स्थायी समितीनी ठराव क्र. १८ दिनांक २३/०३/२०१८ अन्वये घेतलेल्या निर्णयान्वये भाग ब च्या कामांतर्गत सोबत टांचण केलेल्या यादीतील वार्ड़ निहाय, सेक्टर निहाय मिळकतीकरीता घरोघरी जावून जी.आय.एस. डाटा गोळा करणेची जबाबदारी विभागून मे अनंत टेक्नॉलॉजी प्रायव्हेट लिमिटेडला व मे. सायबरटेक सिस्टीम्स़ ॲन्ड़ सॉफ्टवेअर लि ला देण्यात आली.<br>**दोन्ही एजन्सींना वार्ड़ निहाय व सेक्टर निहाय दिलेल्या कामाची यादी सोबत दिलेल्या तक्ता** क्र **"अ" वर टांचण आहे.)** |
| | | | २ | सर्वेक्ष्णाकरीता प्रत्येक झोन निहाय नियुक्त कंपन्याची यादी. | मालमत्ता सर्वेक्षणाकरीता प्रत्येक झोन निहाय कंपन्याची नियुक्ती करण्यात आलेली नाही.<br>नागपूर महानगरपालिका सिमेतील मिळकती करीता गोळा करावयाच्या जी.आय.एस. डाटाच्या कामातील भाग "अ" अंतर्गत सॉफ्टवेअर तयार करणे व हार्ड़वेअरचा पूरवठा करणेची जबाबदारी व भाग "ब" अंतर्गत म.न.पा. सीमेतील सर्व मिळकती करीता घरोघरी जावून जी.आय.एस. डाटा गोळा करणेची जबाबदारी मे. सायबरटेक सिस्टीम्स़ ॲन्ड़ सॉफ्टवेअर लि. हया कंपनीला म.न.पा स्थायी समिती ठराव क्र. १६२ दिनांक १०/०९/२०१५ अन्वये देण्यात आली तदनंतर म.न.पा स्थायी समिती ठराव क्र. १८ दिनांक २३/०३/२०१८ अन्वये घेतलेल्या निर्णयान्वये भाग "ब" च्या कामांतर्गत सोबत टांचण केलेल्या यादीतील वार्ड़ निहाय सेक्टर निहाय मिळकतीकरीता |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | घरोघरी जावून जी.आय.एस. डाटा गोळा करणेची जबाबदारी विभागून मे अनंत टेक्नॉलॉजी प्रायव्हेट लिमिटेडला व मे. सायबरटेक सिस्टीम्स अॅन्ड सॉफ्टवेअर लि ला देण्यात आली. **(दोन्ही एजन्सींना वार्ड निहाय व सेक्टर निहाय दिलेल्या कामाची यादी सोबत दिलेल्या तक्ता** क्र **“अ” प्रमाणे आहे.)** |
| | | | ३ | अद्याप किती मालमत्तांचे सर्वेक्षण बाकी आहे. सर्वेक्ष् ण बाकी असल्यास संबंधीत कंपन्यावर काय कार्यवाही करण्यात आली. | दोन्ही कंपन्यांचे अंदाजे ३६०३ बहुभुज आकृती (Polygon) व शहर सिमेलगतच्या काही जमिनीकरीता जी.आय.एस. डाटा गोळा होणे बाकी आहे. उक्त दोन एजन्सी पैकी मे सायबरटेक अॅन्ड सॉफ्टवेअर लि. ला भुगतान करावयाच्या रक्कमेपैकी रु. ९५,९६,९०९/- रोखून ठेवले आहेत व मे. अनंत टेक्नॉलॉजी लि. यांनी केलेल्या कामाबाबत अजूनही कोणतेही भुगातान केलेले नाही. भुगतान करतेवेळी भुगतान रक्कमेतून नियमान्वये दंड आकारण्यात येईल. |
| | | | ४ | सर्वेक्षणासाठी नियुक्त कंपनीतील कार्यरत सर्व कर्मचा-यांची यादी व पदनाम | सध्यास्थीतीत नागपूर महानगरपालीका सीमेतील मालमत्ता सर्वेक्षणासंबंधी कामाकरीता दोन्ही कंपनीतील कार्यरत कर्मचा-यांची यादी सोबत दिलेल्या तक्ता क्र. “ब” प्रमाणे आहे |

**हस्ता/- निगम आयुक्त**
**महानगरपालिका, नागपूर**

**महानगरपालिका सर्वसाधारण सभा (विषय पत्रिकेवर न घेतलेला विषय)**

**दिनांक २०/०१/२०२०**

# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर

(सचिवालय)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४४ अंतर्गत मा. सदस्यांनी प्रशासनाकडे विचारलेला प्रश्न खालील प्रमाणे नमूद असून त्याचा गोषवारा पुढील प्रमाणे.

<table>
<tr><th>प्रश्न क्र.</th><th>मा. सदस्यांचे नाव</th><th>प्रश्नाचे उत्तर</th></tr>
<tr><td>a)</td><td>श्री. प्रवीण प्रभाकर दटके</td><td>
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>प्रश्नाचे विवरण</th><th>उ-तर</th></tr>
<tr><td>१)</td><td>नागपूर शहराची विकास योजना मंजुर होउन २० वर्ष होत आहे. एम.आर.अ‍ॅण्ड टि.पी अ‍ॅक्ट १९६६ च्या तरतुदीनूसार मंजुर विकास योजना सुधारीत करणे आवश्यक आहे. नागपूर शहरासाठी नागपूर महानगरपालिका, नियोजन प्राधिकरण असल्याने, प्रशासनाने असल्याने नागपूर शहराची विकास योजना सुधारीत करण्यासाठी आतापर्यंत कोणती कार्यवाही केली ?</td><td>नागपूर शहराची सुधारीत विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महा. ३७ वा) चे कलम ३१(१) अन्वये शासन, नगर विकास विभाग, अधिसूचना क्र. टिपीएस-२४९६-२६४३- प्र.क्र.३००(अ)-९७-नवी-९, दि. ०७ जानेवारी २००० अन्वये भागश: मंजुर व क्र. टिपीएस- २४००-१६२८- प्र.क्र.२००-२०००-नवी -९, दि.१० सप्टेंबर २००१ नुसार अंतिमत: मंजुर करण्यात आलेली असून ती अनुक्रमे दि. १ मार्च २००० व दि. २१ सप्टेंबर २००१ पासून अंमलात आलेली आहे. तसेच शासन नगर विकास विभागाची अधिसूचना क्र. टिपीएस- २४०१-८५५- प्र.क्र.७६-नवी -९, दि. २७ फेबुवारी २००२ अन्वये सात योजना करीता नागपूर सुधार प्रन्यासला “नियोजन प्राधिकरण” म्हणून घोषित केलेले आहे.<br>शासन निर्णय क्र. नामपा-२०१२/प्र.क्र. १/नवी -२६, दि.१४.०५.२०१३ अन्वये मौजा- हुडकेश्वर (बु.) व मौजा – नरसाळा या महसुली गावांचे ९७२.८२ हे क्षेत्र नागपूर महानगरपालिका हददीत समाविष्ट करण्यात आलेले आहे. तसेच शासन निर्णय क्र. टिपीएस-१४१३/४०५/प्र.क्र.२१३/नवी-९, दि. १४.१०.२०१३ नूसार उक्त वाढीव क्षेत्राकरीता नागपूर महानगरपालिका ही नियोजन प्राधिकरण म्हणून कार्य करेल असे अधिसूचीत करण्यात आले आहे.<br>महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ मधील कलम ३८ च्या अनुषंगाने विकास योजना अंमलात आल्याच्या २० वर्षाच्या आंत विकास योजना सुधारीत करणे अपेक्षित आहे. त्यानूसार नगर विकास विभाग महाराष्ट्र शासनाचे शासन निर्णय क्र. टिपीएस-१८१०/८३/प्र.क्र.२११५/१२०१०/नवी-१३, दि. ०२.०२.२०१२ नूसार विकास योजना अंमलात आल्याच्या दिनांकापासून २० वर्षे पुर्ण होण्यापुर्वी तीन वर्षे अगोदर विकास योजना सुधारीत करण्याची प्रक्रीया सुरु करण्याचे आदेशित आहे.<br>नागपूर शहराची विकास योजना दि. १० सप्टेंबर २००१ ला मंजुर झाली असल्यामुळे २० वर्षाची मुदत सन २०२१ मध्ये पुर्ण होईल व तीन वर्ष अगोदर म्हणेच २०१८ मध्ये विकास योजना सुधारीत करण्याची प्रक्रीया सुरु करणे वरीलप्रमाणे शासन निर्देशानूसार अपेक्षित आहे.<br>शासन निर्णय क्र. टिपीएस-१८१०/८३/प्र.क्र. २११५ / १२०१०/नवी-१३,दि. ०२.०२.२०१२ नूसार नागपूर महानगरपालिकेला सुधारीत विकास योजना तयार करण्याबाबतचा मानस जाहिर करावयाचा असल्यास शासन निर्णयानूसार दि. ०६.०१.२०१७ (अथति ०६.०१.२०२० च्या ३ वर्ष अगोदर ला जाहीर करता येते. परंतू नागपूर महानगरपालिकेला दि. ०६.०१.२०२० च्या ३ वर्षाऐवजी ५ वर्षा आधी विकास योजना शासनाची मंजुरी घेऊन सुधारीत करण्याचा मानस जाहिर करावयाचा असून यासंबंधात नागपूर महानगरपालिकेने ठराव क्र. ७, दि २०.११.२०१४ नूसार सदर विकास योजना तयार करणेकामी विकास योजना विशेष घटकाची निर्मीती करणेस मंजुरी दिलेली आहे.<br>नागपूर शहरात गुंठेवारी विकासाअंतर्गत विकास योजनेच्या विसंगत विकास झाला असल्यामुळे नागपूर शहराची विकास योजना सुधारीत करण्याकरीता विकास योजना घटक स्थापित करण्याचे प्रस्तावित झाले ठराव क्र. ७, दि. २०.११.२०१४ च्या अनुषंगाने मा. प्रधान सचिव १, नगर विकास विभाग यांच्याशी झालेल्या चर्चेनूसार शासनाव्दारे विशेष घटक युनिट उपलब्ध करुन देण्याबाबत मा. प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांनी मनपा नागपूरला ही कामे खाजगी ऐजंसी मार्फत करुन घेता येईल असे सुचविले. त्यानूसार मनपा, नागपूरव्दारे खाजगी एजन्सीकडून विकास योजना सुधारीत करण्याची प्रक्रीया करुन घेण्याकरीता मान्यता मिळाली म्हणून दि. १९.०५.२०१५ अन्वये विनंती करण्यात आली.<br>त्याअनुषंगाने मा. आयुक्त, महानगरपालिका, नागपूर यांना महाराष्ट्र शासनाचे पत्र क्र. टिपीएस-२४१६/२६९/प्र.क्र. १४९ /२०१६ /नवी-९, दि. ०८ नोव्हेंबर २०१६ नूसार नागपूर शहरासाठी सुधारीत विकास योजनेची कामे खाजगी एजन्सीकडून करुन घेण्याकरीता मान्यता प्रदान करण्यात आली</td></tr>
</table>
</td></tr>
</table>

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | त्याअनुषंगाने मा. आयुक्त, महानगरपालिका, नागपूर यांचे सहिशी Tender for appointment of the technical Consultant for cassging out existing land use survey for preparation of Development plan as per MRTP Act 1966 निविदा पत्र क्र. NMC/BID/D.P.)906, दि. १४.०७.२०१७ ला मागविण्यात आला. |

M/s Monarch Surveyer & Engineering Consultant Pvt. Ltd, Pune यांना पत्र क्र.NMC/TPD/129, दि. १२.०४.२०१८ अन्वये Work order देण्यात आला. M/s Monarch Surveyer & Engineering Consultant Pvt. Ltd, Pune यांना महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २५ अंतर्गत सर्व्हेक्षण व विद्यमान जमिन वापर नकाशा तयार करण्याचे काम हे दि. ०६.०९.२०१८ पर्यंत पुर्ण करावयाचे होते. कंत्राटदाराच्या दि. ०६.०९.२०१८ च्या ४ महिन्याच्या मुदतवाढीस मा. आयुक्त, महानगरपालिका, नागपूर हयांचे दि. १९.१०.२०१८ नूसार मान्यता प्रदान करण्यात आली व त्याअनुषंगाने सदर कामाकरीता दि. ०६.०१.२०१९ पर्यंतची मुदतवाढ कंत्राटदारास देण्यात आली.

नगर विकास विभाग महाराष्ट्र शासनाचे शासन निर्णय क्र. विघयो(३७१९/प्र.क्र. ४१ /नवी-२७, दि. २७ मे २०१९ नूसार नागपूर शहराचे पायाभुत नकाशा (बेस मॅप) व विद्यमान भुवापर तसेच प्रस्तावित भुवापर नकाशा तयार करणेसाठी उपसंचालक, नगर रचना, विकास योजना, विशेष घटक, नागपूर, महानगरपालिका, नागपूर घटकास मान्यता देण्यात आली आहे. उक्त विशेष घटकास खाली नमुद एकुण १८ पदांना शासनाने मंजुरी दिली आहे

| **अ.क्र.** | **पदनाम** | **मंजुर पदे** |
|---|---|---|
| १ | उपसंचालक | ०१ |
| २ | नगर रचनाकार | ०१ |
| ३ | सहाय्यक नगर रचनाकार | ०२ |
| ४ | रचना सहाय्यक | ०३ |
| ५ | स्वीय सहाय्यक/उच्च श्रेणी लघुलेखक | ०१ |
| ६ | सहाय्यक आरेखक | ०१ |
| ७ | कनिष्ठ आरेखक | ०३ |
| ८ | वरीष्ठ लिपीक | ०१ |
| ९ | कनिष्ठ लिपीक /लिपीक टकंलेखक | ०२ |
| १० | शिफाई | ०३ |

तसेच प्रस्तुत पदांचे अनुज्ञेय वेतन व भत्ते तसेच आस्थापना खर्च (कार्यालयीन वाहन, दुरध्वनी, संगणक, स्टेशनरी, फर्निचर इत्यादी) संबंधीत महानगरपालिकेमार्फत वहन करण्यास स्थायी समिती ठराव क्र. १९७, दि.०८.०९.२०१४ नूसार मनपा, नागपूर ने प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. उक्त विशेष घटकाची बसण्याची व्यवस्था मनपाची नविन प्रशासकीय इमारतीच्या ५ व्या माळयावर करण्यात आली आहे.

आजतागायत M/s Monarch Surveyer & Engineering Consultant Pvt. Ltd, ने खालीलप्रमाणे कामे पुर्ण केलेली आहेत.

1. Activity
2. Inception Report
3. Establishment of GCPs (Ground Cover Point)
4. Aerial Survey
5. Superimposition of Revenue Records
6. Land use data Collection
7. Existing Land use plan, Surrey maps, Report.

खाजगी एजन्सी या विभागाकडे सादर केलेला विद्यमान जमिन वापर नकाशा छाननीची कार्यवाही विकास योजना विशेष घटकामार्फत आहे.

**हस्ता/- निगम आयुक्त**
**महानगरपालिका, नागपूर**